नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/२०१८
(रुबेन पिंटो – वादी वि. पांडुरंग नाईक व. –प्रतिवादी)

## :– नि. १८ खालील आदेश –:

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी ०६ विजया चिंतामण नाईक या दिनांक २३/९/२०१९ रोजी मयत असून तिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन की, प्रतिवादी ०६ मयत झाल्याबाबत वादीस कोणतीही कल्पना नव्हती. प्रतिवादी नं.६ हिस समन्स बजावणीकरीता पाठविले असता ते समन्स प्रतिवादी नं. ६ दिनांक २३/९/२०१९ रोजी मयत झाली आहे असे शेरा मारुन परत आले. त्यावेळी वादीस प्रतिवादी नं.६ मयत असल्याबाबत दिनांक ३०/१०/२०२० रोजी समजले आहे. दरम्यान कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे व लॉकडाऊन जाहिर केल्यामुळे वादीस वकीलांना भेटून प्रतिवादी नं.६ चे वारस अभिलेखावर दाखल करण्यास ०२ वर्षे ३५ दिवस एवढया कालावधीचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी नं. ६ चे वारस दाखल करुन न घेतल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज कायदेशीर नसल्याने ना नामंजुर करण्यात यावा अशी हरकत घेतली आहे.

४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.६ या दिनांक २३/९/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना ०२ वर्षे ३५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, आज्ञार्थी व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.६ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता १८ कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादीने सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. १८ कडील अर्ज वादीने प्रतिवादीला रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे..

२. वादीने खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं.६ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/-

दिनांक- २८/१०/२०२१

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.